उप मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : मविसे-१०१८/प्र.क्र.२६९/२०१८/आस्था-३,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: ०४ सप्टेंबर, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे-१०/प्र.क्र.२५८/२०१२/आस्था-३, दिनांक २५.१०.२०१३.
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/का.१२, दिनांक २८.०४.२०१५.
३) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/का.१२, दिनांक १६.७.२०१५.
४) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/का.१२, दिनांक १५.६.२०१७.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे-१०१६/प्र.क्र.१०२/२०१६/आस्था-३, दिनांक ४.७.२०१६.
६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे-१०१५/प्र.क्र.१०४/२०१५/आस्था-३, दिनांक ६.८.२०१६.

शासन आदेश :-

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील संदर्भ क्र. ६ येथील दिनांक ६.८.२०१६ अन्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी संवर्गातील काही पदे निवडश्रेणी वेतनश्रेणीसाठी चिन्हांकित करण्यात आली आहेत.

२. उपरोक्त परिस्थितीत महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील उप मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी संवर्गातील (वेतनस्तर एस-२० रुपये ५६१००-१७७५००) मधील खालील पात्र अधिकाऱ्यांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी (निवडश्रेणी) (वेतनस्तर एस-२३ रुपये ६७७००-२०८७००) संवर्गात तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

३. तद्नुषंगाने शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ का.१२, दिनांक २८.०४.२०१५, व इतर विहीत केलेल्या महसुली विभाग वाटप (दुसरी सुधारणा) नियम, २०१७ मधील तरतूदींच्या अधीन नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच शासनाच्या मान्यतेने सदर अधिकाऱ्यांना खालील तक्त्यातील त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र .३ मध्ये दर्शविलेल्या पदावर तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्याचे पदनाम व ठिकाण	तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण	**शेरा**
(१)	(२)	(३)	(४)
१.	श्री.पी.डी.खोपकर, उप संचालक, (नॉन इन्टेंसिव्ह),महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई	उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद रायगड, जिल्हा रायगड	श्री.निखिलकुमार ओसवाल, यांच्या बदलीने रिक्त पदी
२.	श्रीमती विना सुपेकर, उप संचालक, राज्य योजना, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई	सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद	श्री.ए.आर.कुंभार, हे निवडश्रेणी अधिकारी नसल्याने दि.०६.०८.२०१६ रोजीच्या शा.नि. नुसार त्यांच्या जागी

४. वरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर तदर्थ पदोन्नती केवळ ११ महिन्यांसाठी देण्यात येत आहे. सदर तदर्थ पदोन्नतीवर कायम स्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.

२) वरील अधिकाऱ्यांना देण्यात येणारी तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहील.

३) सदर तदर्थ पदोन्नती मा .उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्र.८४५२/२००४ मधील T.A. १/२०१४ आणि T.A. २/२०१४ तसेच रिट याचिका क्र.२७९७/२०१५ न्यायालयीन प्रकरणामध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

४) सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र .२७९७/२०१७ (स्टॅम्प क्र.७२५६/२०१५) महाराष्ट्र राज्य विरुध्द विजय घोगरे व इतर तसेच इतर संलग्न न्यायालयीन प्रकरणात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला अंतिम निर्णय व त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका (डायरी

क्र.३३१५१/२०१७) या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयास अधीन राहील.

५) सदर तदर्थ पदोन्नती ही जे अधिकारी ज्येष्ठ आहेत , परंतु ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आली आहेत, अशा अधिकाऱ्यांच्या ज्येष्ठतेस बाधा न आणता देण्यात येत आहे.

५. संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या वरील अधिकाऱ्यांना स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन , तात्काळ कार्यमुक्त करावे आणि नवीन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर होण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात . तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. यासंदर्भात त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दिनांक ३०.८.१९८२ अन्वये दिलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे. तसेच तदर्थ पदोन्नतीने दिलेली नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाचे आवेदन करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०४११२७३६७९२० आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ananda Shankar Shendage

Digitally signed by Ananda Shankar Shendage
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0db7067f83b51744741b4485650edc8705560188be635df819605b4913ead056, serialNumber=dced31ba3ba0e455430f67304905c6e3544dae39602268d4cf2844818a1f80a4, cn=Ananda Shankar Shendage
Date: 2019.09.04 21:48:41 +05'30'

(आ.शं. शेंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२) मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) खाजगी सचिव
४) मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)

५) मा.प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक
६) विभागीय आयुक्त, कोकण/औरंगाबाद
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा रायगड
८) संचालक, महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई
९) उप संचालक, राज्य योजना, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई
१०) संबंधीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद
११) महालेखापाल- १ /२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१२) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) संबंधित अधिकारी (संबधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत)
१४) सामान्य प्रशासन विभाग, (कार्यासन-१२/कार्यासन-१६ ब), मंत्रालय, मुंबई
१५) कार्यासन क्रमांक आस्था-२, ग्राम विकास विभाग
१६) निवड नस्ती, का.क्र. आस्था-३, ग्राम विकास विभाग